**श्री स्वामी समर्थ**

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## प्रारुप अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३.**

**क्र.मविनिआ/तांत्रिक/विनियम/--- -** विद्युत अधिनियम, २००३ च्या (२००३ चा ३६) कलम ६१ आणि कलम ८६(३) सह कलम १८१ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि वीज दर धोरण, २०१६ च्या खंड ५.३ च्या अनुषंगाने तसेच या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन आणि पूर्व प्रसिध्दीनंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम २०१९ **('मुख्य विनियम')** या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :

## १. प्रस्तावना

विद्युत अधिनियम, २००३ ('वि.अ.२००३' किंवा 'अधिनियम')च्या कलम ८६(१)(इ) नुसार, राज्य विद्युत नियामक आयोगावर ('एसइआरसी' किंवा 'आयोग') ग्रीडशी जोडणी देण्यासाठी आणि कोणत्याही व्यक्तीस विजेची विक्री करण्यासाठी सुयोग्य उपाययोजना प्रदान करुन नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीस प्रोत्साहन देण्याचे कार्य नेमून देण्यात आले आहे. तसेच, राज्य नियामक आयोग अशा स्त्रोतांची उपलब्धता आणि किरकोळ वीज दरावरील त्याचे परिणाम विचारात घेऊन, नूतनशील ऊर्जा स्त्रोतांकडून ऊर्जा खरेदी करण्यासाठी वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रातील एकूण वीज वापराची किमान टक्केवारी निश्चित करेल. राज्य विद्युत नियामक आयोगाकडून वीज दर निश्चित करताना नूतनशील ऊर्जा खरेदीचा खर्च विचारात घेण्यात येईल. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. २७ डिसेंबर, २०१९ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम २०१९ अधिसूचित केले आहेत. ऊर्जा मंत्रालयाने '२०२९-३० पर्यंत नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन (आरपीओ) आणि ऊर्जा साठवणूक बंधन मार्गदर्शिका' आणि विद्युत (हरित ऊर्जा मुक्त प्रवेशाद्वारे नूतनशील ऊर्जेस प्रोत्साहन) नियम, २०२२ जारी केले आहेत. हे बदल, महाराष्ट्र

विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) (पहिली सुधारणा) विनियम, २०२३ मध्ये समुचितपणे समाविष्ट करण्यात आले आहेत.

## २. संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ

२.१ या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) (पहिली सुधारणा) विनियम, २०२३" असे म्हणावे.

२.२ हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

## ३. मुख्य विनियमांच्या विनियम २ मध्ये सुधारणाः-

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१(एफ) नंतर २.१(एफ)(ए) ची भर :-**

**"२.१(एफ)(ए) "एचपीओ" म्हणजे जल-विद्युत खरेदीचे बंधन,"**

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१(जे) नंतर २.१(जे)(ए) ची भरः-**

**"२.१(जे)(ए) "अन्य आरपीओ"** म्हणजे नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन ज्याची पूर्तता विनियम २.१(एफ)(ए) आणि २.१(एन)(ए) अंतर्गत समाविष्ट नसलेल्या कोणत्याही नूतनशील ऊर्जा प्रकल्पामधून निर्माण केलेल्या ऊर्जेद्वारे पूर्तता करता येईल."

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१(एन) नंतर २.१(एन)(ए) ची भरः-**

**"२.१(एन)(ए)"पवन ऊर्जा आरपीओ"** म्हणजे नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन ज्याची पूर्तता ३१ मार्च, २०२२ नंतर कार्यान्वित झालेल्या पवन ऊर्जा प्रकल्पांमधून (डब्ल्युपीपी) निर्माण केलेल्या ऊर्जेद्वारे आणि ३१ मार्च, २०२२ पर्यंत कार्यान्वित झालेल्या डब्ल्युपीपी मधून ७ टक्क्यांपेक्षा जास्त पवन ऊर्जा वापराद्वारे करता येईल."

## ३. मुख्य विनियमांच्या विनियम ४ मध्ये सुधारणा:-

**मुख्य विनियमांच्या विनियम ४.२ मध्ये उप-खंड 'डी' मध्ये सुधारणा आणि नवीन उप-खंड '(एच)(ए)' ची भर :-**

"४.२ (डी) मोठे जल-विद्युत प्रकल्प (एलएचपी), पम्प्ड स्टोअरेज प्रकल्प, लघु जल-विद्युत, मिनी जल-विद्युत, मायक्रो जल-विद्युत प्रकल्पांसह सर्व जल-विद्युत प्रकल्प (एचपीपी)

४.२ **(एच)(ए) हरित हायड्रोजन आणि हरित अमोनिया"**

**मुख्य विनियमांच्या विनियम ४.३ नंतर ४.३ (ए) ची भर:-**

**"४.३(ए) एचपीओ लक्ष्यांक:**

**ए) "एचपीओ** ची पूर्तता ८ मार्च, २०१९ रोजीपासून ३१ मार्च, २०३० पर्यंत कार्यान्वित झालेल्या सर्व जल-विद्युत प्रकल्पांमधून (पम्प्ड स्टोअरेज प्रकल्प (पीएसपी) आणि लघु जल-विद्युत प्रकल्पांसह (एसएचपी)) निर्माण केलेल्या ऊर्जेद्वारे करता येईल.

बी) अन्य आरपीओ वर्गवारीमध्ये ८ मार्च, २०१९ पूर्वी कार्यान्वित झालेल्या जल-विद्युत प्रकल्पामधील मोफत विजेसह अन्य सर्व जल-विद्युत प्रकल्पामधून (एचपीपी) निर्माण झालेली ऊर्जा विचारात घेण्यात येईल.

सी) वितरण परवानाधारकाच्या एचपीओची पूर्तता, वितरण परवाना क्षेत्रामध्ये विजेचा वापर केला असल्यास स्थानिक क्षेत्र विकासामधील योगदान वगळून, त्या वेळेपर्यंतच्या करारानुसार ८ मार्च, २०१९ नंतर कार्यान्वित झालेल्या मोठ्या जल-विद्युत प्रकल्पांमधून (पम्प्ड स्टोअरेज प्रकल्प (पीएसपी) आणि लघु जल-विद्युत प्रकल्प (एसएचपी) सह) राज्याला पुरविण्यात आलेल्या मोफत विजेमधून करता येईल.

डी) जर एचपीओ लक्ष्यांकाच्या पूर्ततेसाठी उपरोल्लेखित मोफत वीज पुरेशी नसेल तर, वितरण परवानाधारकाला त्यांच्या एचपीओ लक्ष्याकांची पूर्तता

करण्यासाठी अतिरिक्त जल-विद्युत खरेदी करावी लागेल किंवा जल-विद्युतच्या संबंधात संबंधित रकमेइतकी नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे खरेदी करता येतील.

इ) भारताबाहेरुन आयात केलेली जल-विद्युत एचपीओ बंधनाच्या पूर्ततेसाठी विचारात घेण्यात येणार नाही."

**मुख्य विनियमांच्या विनियम ६ मध्ये सुधारणा:-**

**मुख्य विनियमांच्या विनियम ६ मध्ये बदल:**

"या विनियमांतर्गत विनिर्दिष्ट केलेल्या आरपीओ चौकटीचा कार्य कालावधी १ एप्रिल, २०२० पासून सुरु होईल आणि ३१ मार्च, २०३० पर्यंत वैध राहील."

**मुख्य विनियमांच्या विनियम ७ मध्ये सुधारणा:-**

**आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचे नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाचे लक्ष्यांक वगळणे:**

मुख्य विनियमांच्या विनियम ७.१ मधील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेले आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचे आरपीओ लक्ष्यांक वगळण्यात आले आहेत. आर्थिक वर्ष २०२४-२५ ते २०२९-३० साठीचे आरपीओ लक्ष्यांक विनियम ७.५ (ए) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले आहेत.

**मुख्य विनियमांच्या विनियम ७.५ नंतर ७.५ (ए) ची भर:-**

**७.५(ए)** प्रत्येक बंधन असलेली संस्था/व्यक्ती, एका वर्षात सर्व स्रोतांपासून खरेदी केलेल्या एकूण विजेपैकी पात्र नूतनशील ऊर्जा स्रोतांपासून निर्माण झालेल्या विजेची खरेदी, खालील तक्त्यात नमूद केलेल्या टक्केवारीच्या मर्यादेपर्यंत करील:

| वर्ष | **नूतनशील ऊर्जा स्रोतांपासून (युनिटमधील सममूल्य ऊर्जा) करावयाच्या वीज खरेदीचे परिमाण (टक्केवारीत)** | | | |
|---|---|---|---|---|
| | **पवन ऊर्जा आरपीओ** | **एचपीओ** | **अन्य आरपीओ** | **एकूण आरपीओ** |
| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
| २०२४-२५ | २.४६% | १.०८% | २६.३७% | २९.९१% |
| २०२५-२६ | ३.३६% | १.४८% | २८.१७% | ३३.०१% |

| वर्ष | **नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून (युनिटमधील सममूल्य ऊर्जा) करावयाच्या वीज खरेदीचे परिमाण (टक्केवारीत)** | | | |
|---|---|---|---|---|
| | **पवन ऊर्जा आरपीओ** | **एचपीओ** | **अन्य आरपीओ** | **एकूण आरपीओ** |
| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
| २०२६-२७ | ४.२९% | १.८०% | २९.८६% | ३५.९५% |
| २०२७-२८ | ५.२३% | २.१५% | ३१.४३%% | ३८.८१% |
| २०२८-२९ | ६.१६% | २.५१% | ३२.६९% | ४१.३६% |
| २०२९-३० | ६.९४% | २.८२% | ३३.५७% | ४३.३३% |

परंतु असे की, विशिष्ट वर्षात 'अन्य आरपीओ' वर्गवारीचे लक्ष्यांक साध्य करण्यात आलेली तूट एकतर ३१ मार्च, २०२२ नंतर कार्यान्वित झालेल्या पवन ऊर्जा प्रकल्पांमधून (डब्ल्युपीपी) त्या वर्षासाठीच्या पवन ऊर्जा आरपीओच्या पलीकडे वापरलेल्या जास्तीच्या ऊर्जेद्वारे किंवा ८ मार्च २०१९ नंतर कार्यान्वित झालेल्या पात्र मोठ्या जल-विद्युत प्रकल्पांमधून (पम्प्ड स्टोअरेज प्रकल्प (पीएसपी) आणि लघु जल-विद्युत प्रकल्पांसह (एसएचपी)) वापरलेल्या जास्तीच्या ऊर्जेद्वारे, त्या वर्षासाठीच्या 'एचपीओ'च्या व्यतिरिक्त किंवा अंशतः दोन्हीकडून, भरुन काढता येऊ शकेल.

परंतु आणखी असे की, विशिष्ट वर्षात पवन-ऊर्जा आरपीओ' साध्य करण्यात आलेली तूट जल-विद्युत प्रकल्पामधून वापरलेल्या अतिरिक्त ऊर्जेने भरुन काढता येऊ शकेल, जी त्या वर्षासाठीच्या 'एचपीओ' पेक्षा जास्त असेल किंवा त्याउलट असेल.

परंतु असेही की, १० मेगावॅटपेक्षा कमी सर्वोच्च मागणी असलेले वितरण परवानाधारक, १ मेगावॅट आणि त्यापेक्षा जास्त स्थापित क्षमता असलेल्या स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पाचे उपयोगकर्ते आणि १ मेगावॅट आणि त्यापेक्षा जास्त करारांतर्गत मागणी असलेले मुक्त प्रवेश ग्राहक, यांनी वरील तक्त्यातील रकाना (डी) मध्ये ठरवून दिलेल्या त्यांच्या फक्त संयुक्त आरपीओ लक्ष्यांकाची वार्षिक पूर्तता करणे आवश्यक राहील;

**मुख्य विनियमांच्या विनियम ७.६ मध्ये बदलः**

“७.६ बंधन असलेल्या संस्था/व्यक्तिंना त्यांच्या आरपीओ बंधनाच्या लक्ष्यांकांची पूर्तता खालीलपैकी एक किंवा अधिक मार्गाने करता येईलः

(ए) नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून स्वतः केलेली वीजनिर्मिती

(बी) कोणत्याही विकासकाकडून थेट किंवा वीज व्यापारी परवानाधारकाकडून किंवा वीज बाजारपेठेतून मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून नूतनशील ऊर्जा प्राप्त करुन.

(सी) वितरण परवानाधारकाकडून मागणीनुसारः

(एक) कोणतीही बंधन असलेली संस्था/व्यक्ती त्याच्या वीज वापराच्या ठराविक टक्क्यांपर्यंत किंवा त्याच्या संपूर्ण वीज वापरापर्यंत हरित ऊर्जा खरेदी करु शकते आणि ते यासाठी त्यांच्या वितरण परवानाधारकाकडे मागणी करु शकतात, जो अशा प्रमाणात हरित ऊर्जा प्राप्त करील आणि त्याचा पुरवठा करील.

(दोन) ग्राहक स्वेच्छेने त्याच्यावरील बंधनापेक्षा जास्त नूतनशील ऊर्जा खरेदी करु शकतो आणि अंमलबजावणीच्या सुलभतेसाठी हे प्रमाण पंचवीस टक्क्यांच्या टप्प्यात किंवा शंभर टक्क्यांपर्यंत असू शकते.

(तीन) हरित ऊर्जेसाठीचे दर आयोगाकडून स्वतंत्रणे निश्चित करण्यात येतील, ज्यामध्ये नूतनशील ऊर्जेची सरासरी एकत्रित वीज खरेदी किंमत, क्रॉस-सबसिडी आकार, असल्यास, आणि हरित ऊर्जेचा पुरवठा करण्यासाठी वितरण परवानाधारकाच्या विवेकपूर्ण खर्च समाविष्ट असणारे सेवा शुल्क यांचा समावेश असेल.

(चार) वितरण परवानाधारकाकडून हरित ऊर्जेची कोणतीही मागणी किमान एक वर्षाच्या कालावधीसाठी असेल.

(पाच) हरित ऊर्जेचे प्रमाण किमान एक वर्षासाठी पूर्व-विनिर्दिष्ट केले जाईल.

(सहा) वितरण परवानाधारकाकडून किंवा वितरण परवानाधारका व्यतिरिक्त नूतनशील ऊर्जा स्त्रोतांकडून बंधन असलेली संस्था/व्यक्तीच्या नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनापेक्षा जास्त खरेदी केलेली हरित ऊर्जा वितरण

परवानाधारकाच्या नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाच्या पूर्ततेमध्ये गणली जाईल.

सात) वितरण परवानाधारकाद्वारे पुरविलेल्या नूतनशील ऊर्जेचे लेखे मासिक तत्त्वावर ठेवण्यात येतील.

डी) स्व-वापरासाठीचे वीज निर्मिती प्रकल्पामधून नूतनशील ऊर्जा वापरुन

इ) नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे (आरइसी) खरेदी करुन,

एफ) हरित हायड्रोजन किंवा हरित अमोनियाची खरेदी करुन.

हरित हायड्रोजन किंवा हरित अमोनियाचे प्रमाण नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून एक मेगावॅट वीजेमधून हरित हायड्रोजन किंवा हरित अमोनिया उत्पादित करण्याच्या सममूल्य किंवा त्याच्या पटीत गणण्यात येईल आणि या संदर्भातील निकष केंद्रीय आयोगाकडून अधिसूचित करण्यात येतील.

जी) केंद्र सरकारद्वारे निश्चित करण्यात येतील असे अन्य कोणतेही स्त्रोत.

परंतु असे की, आयोगाने मान्यता दिलेल्या सामान्य (जेनेरिक) वीज दराने किंवा पारदर्शक स्पर्धात्मक बोली प्रक्रिये द्वारे मिळविलेल्या दराने तसेच त्यास आयोगाकडून उचित मान्यती/स्वीकृती मिळवून, वितरण परवानाधारकाकडून प्राप्त केलेली नूतनशील ऊर्जा अशा वितरण परवानाधारकाच्या आरपीओ बंधनाच्या पूर्ततेसाठी पात्र परिमाण म्हणून विचारात घेण्यात येईल.

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम २०१० अधिसूचित होण्याआधी स्वाक्षांकित झालेल्या करारानुसार नूतनशील ऊर्जेची प्राप्ती अशा वितरण परवानाधारकाच्या आरपीओ बंधनाच्या पूर्ततेसाठी पात्र प्रमाण म्हणून विचारात घेण्यात येईल.

**मुख्य विनियमांच्या विनियम ७.६ नंतर ७.७ ची भरः-**

**“७.७ ऊर्जा साठवणूक बंधन**

(ए) ऊर्जा साठवणूक बंधनाची गणना विजेच्या एकूण वापराच्या टक्केवारीच्या रुपात करण्यात येईल आणि ऊर्जा साठवणूक प्रणालीमध्ये (इएसएस) साठवलेल्या एकूण ऊर्जेपैकी किमान ८५ टक्के ऊर्जा, वार्षिक तत्त्वावर, नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून प्राप्त केली जाईल तेव्हाच त्याची पूर्तता केल्याचे मानण्यात येईल.

(बी) वापरलेल्या एकूण ऊर्जेची खालील टक्केवारी सौर/पवन ऊर्जेसह/साठ्याद्वारे असेलः

| वर्ष | साठवणूक (ऊर्जेच्या तत्त्वावर) |
|---|---|
| २०२४-२५ | १.५ % |
| २०२५-२६ | २.० % |
| २०२६-२७ | २.५ % |
| २०२७-२८ | ३.० % |
| २०२८-२९ | ३.५ % |
| २०२९-३० | ४.० % |

(सी) विनियम ७.५ (ए) मध्ये उल्लेख केल्यानुसार एकूण आरपीओच्या पूर्ततेचा भाग म्हणून नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून साठवण केलेल्या ऊर्जेच्या मर्यादेपर्यंत ऊर्जा साठवणूक बंधन विचारात घेण्यात येईल.

(डी) कोणतेही नवीन वाणिज्यिकदृष्ट्या व्यवहार्य ऊर्जा साठवणूक तंत्रज्ञान सामावून घेण्यासाठी आणि बॅटरी एनर्जी स्टोअरेज सिस्टमच्या (बीइएसएस) खर्चात कपात करण्यासाठी, पम्प्ड स्टोअरेज प्रकल्पाचे (पीएसपी) कार्यान्वयन/संचालन विचारात घेऊन ठराविक काळाने ऊर्जा साठवणूक बंधनाचा आढावा घेण्यात येईल.

**मुख्य विनियमांच्या विनियम ८ मध्ये सुधारणाः-**

**मुख्य विनियमांच्या विनियम ८ मध्ये बदलः**

“परंतु असे की, बंधन असलेल्या संस्था/व्यक्तींनी आरपीओची पूर्तता जर प्रमाणपत्राच्या खरेदीने करण्याचे ठरविले तर, विनियम ७.१ ते ७.५(ए) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेगवेगळ्या नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून करावयाच्या वीज

खरेदीच्या बंधनाची पूर्तता केंद्रीय आयोगाच्या आरइसी विनियमांनुसार उचित प्रमाणपत्रांची खरेदी करुन करता येईल.”

**मुख्य विनियमांच्या विनियम १२ मध्ये सुधारणाः-**

**मुख्य विनियमांच्या विनियम १२.१ ते १२.३ मध्ये बदलः**

१२.१ बंधन असलेल्या संस्था/व्यक्तिने प्रत्येक वर्षात प्राप्त करावयाच्या नूतनशील ऊर्जेची किमान टक्केवारी विनियम ७.१ मध्ये देण्यात आली आहे.

१२.२ वितरण परवानाधारक केंद्र शासनाने वेळोवेळी अधिसूचित केलेले लक्ष्यांक साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहतील आणि हे लक्ष्यांक प्राप्त केल्यावर त्यांना विनियम ७.१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किमान टक्केवारीपेक्षा जास्त प्राप्त केलेल्या नूतनशील ऊर्जेसाठी रु. ०.२५ प्रति युनिट ते केंद्र शासनाने खालीलप्रमाणे अधिसूचित केलेल्या टक्क्यांपर्यंत किंवा वेळोवेळी अधिसूचित करण्यात येईल त्याप्रमाणे प्रोत्साहन-अधिदान मिळेलः

| वर्ष | सौर | बिगर सौर | एकूण |
|---|---|---|---|
| २०२०-२१ | ८.७५% | १०.२५% | १९.००% |
| २०२१-२२ | १०.५०% | १०.५०% | २१.००% |

परंतु असे की, वितरण परवानाधारकाने एकत्रित तत्त्वावर नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाची पूर्तता केलेली नाही तर असे प्रोत्साहन-अधिदान लागू राहणार नाही;

परंतु आणखी असे की, मागील वर्षीच्या आरपीओची पूर्तता करण्यासाठी या वर्षात प्राप्त केलेली नूतनशील ऊर्जा प्रोत्साहन-अधिदानासाठी पात्र नूतनशील ऊर्जेचे परिमाण निश्चित करताना वजा करण्यात येईल.

१२.३ विनियम ७.१ किंवा ७.५(ए) मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार नूतनशील ऊर्जेच्या किमान टक्केवारीची पूर्तता करण्यात येणारी आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील कोणतीही तूट आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील तूट आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये, आर्थिक वर्ष २०२५-२६ आणि आर्थिक वर्ष २०२६-२७ मधील तूट आर्थिक वर्ष २०२७-२८ मध्ये आणि आर्थिक वर्ष २०२८-२९ मधील तूट आर्थिक वर्ष २०२९-३० मध्ये पुढे ओढण्यात येईल आणि बंधन असलेली संस्था/व्यक्ति अशी तूट एकत्रित तत्त्वावर

अनुक्रमे ३१ मार्च, २०२३ आणि ३१ मार्च, २०२५, ३१ मार्च, २०२८ आणि ३१ मार्च, २०३० पर्यंत भरुन काढू शकेल.

परंतु असे की, एकूण नूतनशील ऊर्जेच्या प्राप्तीच्या प्रत्येक वर्षासाठीच्या लक्ष्यांकामधील एकत्रित तुटीकरिता वितरण परवानाधारकाच्या एकूण महसुली गरजेमध्ये रु. ०.१० प्रति युनिट दराने कपात करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, बंधन असलेल्या अन्य संस्था/व्यक्तिंना एकूण नूतनशील ऊर्जेच्या प्राप्तीच्या प्रत्येक वर्षासाठीच्या लक्ष्यांकामधील एकत्रित तुटीकरिता रु. ०.१० प्रति युनिट दंड आकारण्यात येईल;

परंतु असेही की, ३१ मार्च, २०२३ आणि/किंवा ३१ मार्च, २०२५ आणि/किंवा ३१ मार्च, २०२८ आणि/किंवा ३१ मार्च, २०३० रोजीची नूतनशील ऊर्जा प्राप्तीमधील कोणतीही एकत्रित तूट पुढील वर्षीसाठी ओढण्यात येणार नाही आणि वितरण परवानाधारकाच्या वार्षिक महसुली गरजेमध्ये कपात करुन आणि बंधन असलेल्या संस्था/व्यक्तिंना त्या दिनांका रोजीच्या संबंधित आरईसीच्या किमान किंमतीच्या दराने दंड आकारणी करुन, समायोजित करण्यात येईल;

परंतु असेही की, बंधन असलेल्या संस्था/व्यक्तिने जर, आरईसीच्या प्राप्तीसह, शक्य त्या सर्व उपाययोजना करुन देखील आरपीओ लक्ष्यांकाची पूर्तता करणे शक्य झाले नसल्याचे दाखवून दिल्यास, आयोग, त्या आदेशामध्ये ठरवून दिलेल्या अटींच्या अधीन राहून, दंडाच्या रकमेत कपात करु शकेल.

मुंबई,
दिनांक : ऑगस्ट, २०२३

**(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग